**International Journal of Advance and Applied Research**
www.ijaar.co.in
**ISSN – 2347-7075** **Impact Factor – 7.328**
**Peer Reviewed** **Bi-Monthly**
**Vol.9 No.5** **May – June 2022**

# आंतर विद्याशाखीय व बहुविद्याशाखीय संशोधनाच्या विविध संधी

प्रा.पाटील वंदना सांडुराव
कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय चिंचोली (लिं), ता.कन्नड, जि.औरंगाबाद
ईमेल : vandanawani74@gmail.com
***Corresponding Author -*** प्रा.पाटील वंदना सांडुराव
**Email-** vandanawani74@gmail.com

## सारांश

मनुष्य हा जन्मतःच जिज्ञासू आहे. जेंव्हा एखादी अपरिचित गोष्ट नजरेस पडते तेंव्हा त्याला त्याबद्दल कुतूहल वाटते. त्याविषयी अधिकाधिक माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला जातो. कुतूहल हीच सर्व ज्ञानाची जननी आहे. ज्ञान मिळविण्याची पध्दती म्हणजे संशोधन होय. म्हणजेच उपजत कुतूहल प्रवृत्तीतून संशोधनाला चालना मिळते. याचाच अर्थ, संशोधन म्हणजे नवीन ज्ञानप्राप्ती होय. आधुनिक काळात संशोधनास विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. विकसित देशात नैसर्गिक किंवा भौतिक विज्ञान, सामाजिक विज्ञान, मानव्यविज्ञान इत्यादी विज्ञानामध्ये प्रचंड प्रमाणात संशोधन कार्य झाले आणि अजूनही सुरु आहे. मागासलेल्या देशांना ही संशोधनाचे महत्त्व कळाले असून त्या देशातही संशोधन कार्य सुरु करण्यात आले आहे. आज असे एकही क्षेत्र नाही की, ज्याचे वैज्ञानिक पध्दतीने अध्ययन केले जात नाही. आत्तापर्यंत दुर्लक्षित असणाऱ्या अनेक विषयांचे वैज्ञानिक पध्दतीने अध्ययन केले जात आहे.

प्रस्तावना :–

मानवी जीवनात साहित्य आणि कलेलाही अतिशय महत्त्वपूर्ण स्थान आहे. मानवी मनाचा, विचारांचा, भावनांचा अविष्कार म्हणून साहित्य निर्माण झाले आहे. माणूस हा साहितयचा केंद्रबिंदू आहे. माणसाची कृती–उक्ती, त्याचा स्वभाव, त्याचे अनुभव, त्यांच्या संवेदना, जाणिवा इत्यादींची अभिव्यक्ती साहित्याद्वारे होत असते. तसेच समाजाच्या सुख दुःखाचं, भावभावनाचं प्रतिबिंब हे साहित्यात उमटत असतं. म्हणून साहित्य हा समाजाचा आरसा आहे असे म्हटले आहे. कारण समाजाचा एक सदस्य म्हणून लेखकाने अनुभवलेले सामाजिक वास्तव तो आपल्या साहित्यकृती मधून मांडत असतो. साहित्यातून लेखक व्यक्तिगत आणि सामाजिक अनुभव मांडत असतो. कोणतीही साहित्यकृती ही समाज निरपेक्ष असू शकत नाही. साहित्य आणि समाज यांचा परस्पर संबंध लक्षात घेवूनच आधुनिक काळात समाज शास्त्रज्ञांनी साहित्याच्या समाजशास्त्रीय अध्ययनावर विशेष भर दिला. विसाव्या शतकात साहित्याचे समाजशास्त्र ही एक नवीन अभ्यास शाखा विकसित झाली. आज साहित्याचे समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अध्ययन केले जाते. साहित्याचा समाजशास्त्रीय, राज्यशास्त्रीय, इतिहास इत्यादी सामाजिक विज्ञानाच्या सहाय्याने साहित्याचे अध्ययन, संशोधन केले जाते. परंतू संपूर्ण साहित्य किंवा वाङ्मयाचा वैज्ञानिक पध्दतीने अभ्यास करणे ही वेगळी बाब आहे. भौतिक आणि सामाजिक क्षेत्राप्रमाणेच साहित्य देखील एक संशोधनाचे क्षेत्र आहे. कारण साहित्य हे कोणत्या प्रकारचे विज्ञान मानायचे हा प्रश्न निर्माण होतो. सामाजिक विज्ञानापैकी वर्तनवादी विज्ञानास ते जवळचे आहे. अ.का.प्रियोळकर यांनी 'प्रिय अप्रिय' या पुस्तकातील 'संशोधनाचे संशोधन' या निबंधात संशोधन क्षेत्राचे वेगळेच वर्गीकरण दिले आहे ते पुढीलप्रमाणे –

1) विद्वत संशोधन ¼**Academic Research**½ **&** भाषा व वाङ्‌मय यांचे संशोधन या प्रकारात मोडते, याचे क्षेत्र मुख्यतः ग्रंथालय आहे.

2) वैज्ञानिक संशोधन ¼**Scientific Research**½ **&** वैज्ञानिक संशोधनाचे क्षेत्र प्रयोगशाळा आहे.

3) सामाजिक संशोधन ¼**Social Research**½ **&** लोक, समाज, जातीसंस्था इत्यादींचा अभ्यास सामाजिक संशोधनात केला जातो.

4) कला विज्ञान संशोधन ¼**Technological Research**½ **&** व्यापार, उद्योगधंद्याकरिता या संशोधनाचा उपयोग होतो.

संशोधन क्षेत्राच्या संदर्भात करण्यात आलेले वरील वर्गीकरण काटेकोर नाही. भाषा, वाङ्‌मय, इतिहास याप्रमाणे सामाजिक विज्ञानाचे संशोधन हे सुध्दा विद्वत संशोधन आहे. साहित्य क्षेत्रीय संशोधनाची मुलभूत भूमिका ही इतर क्षेत्रीय संशोधनाप्रमाणेच आहे. याचा अर्थ कोणती तरी एक समस्या घेवून त्याचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न करणे ही गोष्ट सर्वच संशोधनात समान आहे.

जीवनाचे काल्पनिक चित्र आकर्षक रितीने मांडण्याचे कार्य वाङ्‌मयाद्वारे होत असते. साहजिकच सभोवतालची सृष्टी ही साधनसामग्री सदैव त्यांच्या हाताशी असते. त्याचे प्रतिबिंब त्याच्या साहित्यात उमटते. संशोधकाला हा अनुबंध शोधावा लागतो. श्री.ना.पेंडसे, व्यंकटेश माडगुळकर, गो.नी.दांडेकर यांच्या साहित्याने त्या त्या लेखकाच्या परिसरातील जीवन वैशिष्ट्यांना साकार केले, तो परिसर त्या परिसरात राहणारा समाज, तेथील संस्कृती इत्यादींचे साहित्यात पडलेले प्रतिबिंब याचा शोध घेण्याचे काम संशोधकाला करावयाचे असते.

कोणताच मानवी अनुभव हा केवळ एकेरी किंवा एकपदरी असत नाही. अतिशय प्रगत अवस्थेतील समाजात वावरत असलेल्या व्यक्तीच्या अनुभवाचे धागेदोर हे फार दूरवर व अनेक क्षेत्रामध्ये जावून पोहचणारे असतात. व्यक्तीच्या भोवताली असलेली कौटूंबिक, धार्मिक, राजकीय, सामाजिक अशी सगळी परिस्थिती समजल्याशिवाय तिच्या विशिष्ट अनुभवांचे खरे रुप लक्षात येणे शक्य नसते. धर्मांतराआधीची व धर्मांतरानंतरची परिस्थिती समजून घेतल्याशिवाय आपल्याला दलित लेखकांचे आकलन होणार नाही.

वाङ्‌मयाचा समाज व संस्कृतीशी अनुबंध –

संस्कृती म्हणजे मानवाच्या समग्र वर्तनाचीच प्रकट दर्शन असते. शेती, पशुपालन, स्थापत्य, धातुकाम, यंत्रनिर्मिती, वस्त्रोत्पादन, अर्थोत्पादन या गोष्टींची संपन्नता भौतिक संस्कृतीत अभिप्रेत असते. धर्म, नीती, कायदा, ललित कला, वाङ्‌मय, सभ्यता, शिष्टाचार इत्यादी गोष्टींचा समावेश अध्यात्मिक संस्कृतीत होतो. या दोन्ही प्रकारच्या संस्कृतीचा अनोन्य संबंध आहेत. संस्कृतीचा संबंध मानवी जीवनाशी, समाज जीवनाशी आहे. जीवन गतीमान, विकसनशिल असल्याने संस्कृतीही विकसनशिल आहे. भाषा आणि संस्कृती, भाषा आणि साहित्य यांच्यात अविभाज्य संबंध आहेत. साहित्य आणि संस्कृती यांच्यातही अविभाज्य संबंध आहे.

कला :–

मुळात साहित्य हीच कला आहे. तिच्या प्रभावी निर्मितीसाठी विविध कलांचा कसा कौशल्याने उपयोग करुन घेतला जातो हे आंतर विद्याशाखीय संशोधनात महत्वाचे ठरते. साहित्यामध्ये आलेले किर्तनकार, प्रवचनकार, विविध लोककला सादर करणारे गायक, वादक, चित्रकार यांच्या अनुरोधाने निर्माण झालेले साहित्य कलेशी नाते सांगते. वाङ्‌मयाचे संगीत आणि इतर शुध्द कला यांच्याशी खूपच वेगळे आणि गुंतागुंतीचे संबंध असतात. काव्याने काही वेळेस चित्रे किंवा शिल्पे यांच्यापासून स्फुर्ती घेतली आहे.

तत्त्वज्ञान :–

साहित्यावर अनेक तत्वज्ञानाचाही प्रभाव पडलेला दिसतो. गांधीवादी तत्वज्ञानाच्या प्रभावातून वि.स.खांडेकर, मामा वरेरकर, र.वा.दिघे इत्यादी अनेक लेखकांचे साहित्य निर्माण झालेले दिसते. मार्क्सवादी तत्वज्ञानातून अण्णाभाऊ साठे, नारायण सुर्वे इत्यादी लेखकांचे लेखन झालेले दिसते. तसेच आंबेडकरांच्या तत्वज्ञानाच्या प्रभावातूनही अनेक दलित लेखकांची साहित्य

निर्मिती झालेली दिसते. म्हणजेच या लेखकांनी त्या त्या तत्वज्ञानाचा पुरस्कार कसा केला, व्यक्तीप्रमाणेच समष्टीलाही अर्थ असल्याची जाणीव कशी दिली; समाजभिमुखता आणि वास्तवता यांना नवे अर्थ कसे प्राप्त झाले हे संशोधकाने साहित्य निर्मिती मागील तत्वज्ञानाचा शोध घेत त्याची परस्परपूरकता तपासली पाहिजे. लेखकांची साहित्यकृती एखाद्या तत्वज्ञानाला केंद्रस्थानी ठेवून निर्माण होते. संशोधकानेही या तत्वज्ञनाचा मागोवा घेत संशोधन केले पाहिजे.

इतिहास :–

स्थळ, काळ, परिस्थितीप्रमाणे बदलणारा तपशिल हा ऐतिहासिक म्हणता येईल. तो बरेचदा संस्कृती विशिष्ट असतो. त्या त्या समाजातील आचार विचार, रुढी, परंपरा, नैतिक कल्पना, त्याचे भौतिक सृष्टीचे आकलन वगैरे गोष्टींशी तो निगडीत असतो. साहित्यादी कलांतून तो कमी अधिक प्रमाणात अविष्कृत होतो. त्या त्या काळातील जीवन सर्वच वाङ्मय प्रकारात सारख्या प्रमाणात अविष्कृत होत नाही. महाकाव्यात आणि त्याचे आधुनिक रुप म्हणून गणल्या जाणाऱ्या कादंबरीत ते सर्वाधिक व्यक्त होत असते. रामायण व महाभारत यांना आपण इतिहास काव्ये म्हणतो. एखाद्या साहित्यकृतीचा इतिहासाशी संबंध संशोधनात महत्वपूर्ण ठरतो.

साहित्याचा इतिहासाशी संबंध सामाजिक, सांस्कृतिक, शिक्षण विषयक, आर्थिक, राजकीय असा विविध प्रकारचा असू शकतो. उदा. महानुभाव साहित्यातील काही ग्रंथ यादवकालीन इतिहासाचा उत्कृष्ट नमुना आहे. तत्कालिन समाजशास्त्र, धर्मशास्त्र व सांस्कृतिक परिस्थिती यांचा अभ्यास करण्यासाठी हे साधन ग्रंथ महत्वाचे ठरतात.

राज्यशास्त्र :–

साहित्यातून राज्यशास्त्र विषयक मांडलेले विचार संशोधकाने जाणून घेणे महत्वाचे ठरते. या संदर्भात मराठी साहित्यात लिहिल्या गेलेल्या राजकीय कादंबऱ्यांकडे पाहता येईल. हरिभाऊ आपटेंच्या कादंबऱ्या, शि.म.परांजपे यांच्या कथांचा हेतू राजकीय भाष्य हाच आहे. स्वातंत्र्याची तळमळ, स्वाभिमानाची चाड, पारतंत्र्याची लाज इत्यादी विशेष त्यांच्या कथांत येतात. भोवताली वावरणारी ध्येयशून्य, विचारभ्रष्ट व लाळघोटी माणसे व ब्रिटीश राजवट हे त्यांच्या टीकेचे विषय असल्याने या कथांमधून राजकीय क्षेत्राबाबतचे संशोधन करणे शक्य होते. 'धावता घोटा', 'सिंहासन' ही कादंबरी; 'आमदास सौभाग्यवती', 'मी नथुराम गोडसे बोलतोय', 'गांधी विरुध्द गांधी' अशा प्रकारची नाटके राजकीय मतांची कोणतीतरी एक बाजू मांडणारी असतात. त्यांचा अभ्यास करतांना राज्यशास्त्रीय संदर्भही तितकेच महत्वाचे असतात. 'पोताळा' कादंबरी बदलत्या राजकीय परिस्थितीची कथा ठरते.

स्वातंत्रोत्तर काळातील राजकीय घडामोडींचे आणि प्रवृत्ती प्रवाहाचे चित्रण हे 'झाड जगावेगळे', 'तेथे लव्हाळे वाचती', 'डायरी एका मंत्र्याच्या बायकोची', 'सरकारनामा', 'सत्तेचा गुलाम', 'अभिसरण', 'आमदार सौभाग्यवती' अशा कादंबऱ्यांमधून येते. कविता, कादंबरी, नाटक, कथा अशा विविध वाङ्मय प्रकारामधून राजकीय विचारांबाबतची चिकित्सा संशोधकाला करता येते.

अर्थशास्त्र :– साहित्याचा अर्थशास्त्राशी जवळचा संबंध आहे. त्यामुळे कलाकृतींचा अर्थशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास करता येतो. व्यवसाय – उद्योग, आर्थिक उलाढाली, पैशाचा विनियोग, अर्थशास्त्राशी संबंधित असलेली लोकसंख्या, बेकारी अशा अनेकविध बाबी ज्या अर्थशास्त्रावर परिणाम करणाऱ्या आहेत याबाबतचे संशोधन करता येणं शक्य आहे. चंद्रकांत काकोडकरांच्या 'कुणाच्या स्वातंत्र्यासाठी' या कादंबरीत एक प्रवाह आर्थिक आहे. या कादंबरीतील दुष्काळाचे त्यामागे असलेल्या नफेबाजीचे व त्याविषयीच्या ढोंगबाजीचे चित्रण या दृष्टीने लक्षणीय आहे. संजय जोशी यांच्या 'नाचिकेताचे उपाख्यान' या कादंबरीत मोठमोठ्या उद्योग व्यवसायातील उच्चपदस्थ लोकांमध्ये चालणारी गळेकापू स्पर्धा, यशस्वी ठरणारी रॅटरेस आणि त्यासाठी द्यावी लागणारी किंमत या दृष्टीने अर्थशास्त्राचा संबंध येतो. काय मिळालं किंवा मिळवलं हे तिथे पैशाच्या भाषेतच विचारल जातं. ह.मो.मराठे यांच्या

'मार्केट' मध्येही पैसा आणि त्याने खरेदी करता येणारे भौतिक सुख हेच एकमेव साध्य मानणाऱ्या लोकांचे जग येते. 'झाडाझडती' ही कादंबरी अर्थशास्त्रीय विचार व्यक्त करणारी आहे.

समाजशास्त्र :–

समाजशास्त्रीय संशोधनात साहित्य व्यवहार आणि समाज यांच्यातील परस्पर संबंध शोधण्याचा, त्याचा अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न केला जातो. समाजरचनेचे घटक आणि साहित्य संरचनेचे घटक यांचा अन्योन्य संबंध यातून स्पष्ट होतो. समाजशास्त्रीय संशोधन करतांना साहित्य आणि समाज यांच्यातील परस्पर संबंधांचा अभ्यास, सामाजिक घडामोडींचा साहित्य व्यवहारावरील प्रभाव आणि साहित्य व्यवहाराचा सामाजिक जीवनावर होणारा प्रभाव असा दोन्ही बाजूंनी करता येईल. विशिष्ट स्वरुपाचेच साहित्य का निर्माण झाले त्याला विशिष्ट स्वरुप का प्राप्त झाले हे संशोधकाला लक्षात घ्यावे लागते. निर्मितीची पाळेमुळे समाज जीवनात घेण्याचा हा प्रयत्न असतो. बाबुराव बागुलांच्या कथांमधील सामाजिक जाणीवा, अण्णाभाऊ साठे यांच्या कादंबऱ्यातील सामाजिक वास्तव, आंबेडकरी काव्यातील विद्रोह इत्यादी विषय घेवून समाजशास्त्रीय संशोधन करणे शक्य आहे.

विज्ञान व तंत्रज्ञान :–

मानवाने स्वतःच्या व पर्यायाने राष्ट्राच्या प्रगतीसाठी अनेक शोध लावले. त्यातून व्यक्तीचे व समाजाचे जीवन सुखी झाले. साहित्यामध्येही याचे प्रतिबिंब पडले. व्यापक मानवी जीवन हे साहित्याचा केंद्रबिंदू मानला तर ते अपरिहार्यच ठरते.

यंत्रयुगाचे परिणाम मर्ढेकरांनी आपल्या कवितेतून सांगितले. कादंबरीमध्येही विज्ञान साहित्याचा प्रवाह सुरु झाला आणि कादंबरी वाङ्मयात प्रेषित, वामन परत न आला, विप्लवा, देवांसि जिवे मारले, स्कायलॅब अशा कादंबऱ्या प्रकाशित झाल्या. विज्ञान कथा, कविता, कादंबरी ही समकालीन वास्तवाच्या संदर्भात किती अपरिहार्य व सुसंगत आहे याचा अभ्यास अशा संशोधनातून करता येईल. विज्ञान युगातील विविध संदर्भ तसेच तंत्रज्ञानाचे उल्लेख कोणत्या संदर्भात कशाप्रकारे आले आहेत याचाही अभ्यास अशा संशोधनात करता येतो. भारतीय कृषीसंस्कृतीत यंत्रयुगाचा शिरकाव होवू लागताच तिच्या पारंपारिक घडणीला जे तडे जावू लागले त्याचे वैशिष्ट्यपूर्ण दर्शन आनंद यादव यांच्या गोतावळा, उध्दव शेळके यांच्या धग, रा.रं.बोराडे यांच्या पाचोळा कादंबरीत येतो. अशोक व्हटकर यांच्या बगाड कादंबरीत हंबीरचे शेत रेल्वेच्या रुळाखाली जाते आणि तो उध्वस्त होतो याचे चित्रण आहे. वाढत्या शहरीकरणामुळे शेतजमीनीचा होत चाललेला संकोच मोहन पाटील यांच्या बस्तानचा विषय आहे.

सारांश :–

वैज्ञानिक संशोधनातील शोध विषयापेक्षा आणि सामाजिक शास्त्रातील शोध विषयापेक्षा साहित्य संशोधनातील शोध विषय हा अतिशय लवचिक आणि अनेक विद्याशाखा युक्त असा आहे. साहित्याचा संबंध इतिहास, संस्कृती, धर्म, समाज, अध्यात्म यांच्याशी येत असतो. भाषा, बोलीभाषेचे संशोधन करतांना वर्णन प्रक्रियेबरोबरच संस्कृती व समाजाचा अभ्यास अपरिहार्य ठरतो. प्रवास वर्णनावरील संशोधनातून परदेशी संस्कृती वगळता येत नाही. म्हणूनच समाजशास्त्र, मानसशास्त्र, इतिहास, राज्यशास्त्र, तत्वज्ञान, अर्थशास्त्र तसेच विज्ञान यासारख्या अनेक विषयांशी अनेक विद्याशाखांशी असणारा साहित्याचा अनुबंध संशोधनाच्या वेळी लक्षात घ्यावा लागतो.

संदर्भ ग्रंथ :–

1) सामाजिक संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे – डॉ. प्रदीप आगलावे, श्री साईनाथ प्रकाशन नागपूर, सहावी आवृत्ती.
2) सामाजिक संशोधन पध्दती – डॉ.सुधीर बोधनकर, प्रा.विवेक अलोगी, ॲड.मृणाल कुलकर्णी, श्री साईनाथ प्रकाशन नागपूर, सातवी आवृत्ती.
3) संशोधन पध्दती – डॉ.सौ.तरुजा भोसले, साई प्रकाशन, प्रथमावृत्ती.
4) मराठी साहित्य संशोधन : नव्या दिशा – डॉ. अविनाश आवलगांवकर, प्रतिमा प्रकाशन, प्रथमावृत्ती.